**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. विकासाची फळं तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी नक्षली कारवायांना पायबंद घालणं आवश्यक असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन.
2. नागपूरच्या बुटीबोरीमध्ये सुरू होणारा प्रकल्प नूतनीकरणयोग्य ऊर्जा उत्पादनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल असा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास.
3. नागपूर रेल्वे स्थानकावर मनोरुग्णाने केलेल्या हल्ल्यात दोन जण ठार, दोन गंभीर जखमी.
4. सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय ग्रंथालय अभियानाच्या 47 व्या क्षमता निर्माण कार्यक्रमाला वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय इथं सुरुवात.

---------------------------------------------------

**अमित शाह**

'नक्षलवादी कारवाया विरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल,' असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली, त्यावेळी ते बोलत होते. नक्षलवादाने कोणाचंही भलं झालेलं नाही. नक्षलवादी मार्ग चोखाळणाऱ्या सर्वांनी मुख्य प्रवाहात येऊन शस्त्रांचा त्याग करावा, असं आवाहन त्यांनी केलं. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री बैठकीत उपस्थित होते. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे या राज्यांमधल्या नक्षलवादी कारवायांमधे 72 टक्के घट झाली असून त्यांचा बीमोड करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. सरकारनं या भागात दळणवळण आणि संपर्क व्यवस्थेच्या विकासासाठी अनेक उपाययोजना केल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे. या भागात १४ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यात आले तसंच सहा हजार मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले आहेत. चालू वर्षात २०२ नक्षली अतिरेकी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकींमधे मारले गेले, तर ८१२ अतिरेक्यांना अटक झाली. या वर्षात

८१२ नक्षल्यांनी शरणागती पत्करली असून नक्षलप्रभावित जिल्ह्यांची संख्या आता ३८ वर उतरली आहे, अशी माहिती गृह मंत्रालयानं दिली आहे.

--------------------------------------------------

गडकरी

प्रकल्पग्रस्तांना देय असलेल्या भूमिअधिग्रहणाच्या मोबदल्याची तसेच नोकऱ्यांची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे गोरगरीब जनतेला मोठ्या प्रमाणात संकटांचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांपुढे उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा झाला आहे. ही प्रकरणे लवकरात लवकर निकाली लागण्याच्या संदर्भात तातडीने कार्यवाही करा, असे स्पष्ट निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी वेस्टर्न कोल फिल्ड प्रशासनाला दिले. केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री किशन रेड्डी यांच्या प्रमुख उपस्थितीत वेकोलिच्या मुख्यालयात आज बैठक झाली. यावेळी गडकरी म्हणाले की 'भूमि अधिग्रहण करताना मूळ मालकांना आपण कोणत्या दराने पैसे देतोय, हे तपासलं पाहिजे. दोन्ही बाजूंना त्यासंबंधी स्पष्ट कल्पना असली पाहिजे. त्यासाठी आपण केंद्र सरकारचा कायदा लागू करतोय की राज्य सरकारचा कायदा वापरतोय, हे बघावे. केंद्र सरकारचा कायदा आणि राज्य सरकारच्या नियमांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे,' अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

--------------------------------------------------

देवेंद्र फडणवीस

भारताच्या अग्रगण्य नूतनीकरणयोग्य ऊर्जा कंपन्यांपैकी एक असलेल्या आवाडा समूहाने आपल्या नवीन उत्पादन आवाडा इलेक्ट्रो प्रा. लि.ची बुटीबोरी औद्योगिक उद्यान इथं आधारशिला ठेवली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलं. आवाडाच्या सुमारे साडे 13 हजार कोटी गुंतवणुकीचा भाग असलेली ही नवीन सुविधा भारताच्या नूतनीकरणयोग्य ऊर्जा उत्पादनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. 2030 पर्यंत कार्बन उत्सर्जनात 50% पर्यंत घट करण्याच्या आणि 2070 पर्यंत शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या देशाच्या उद्दिष्टात ही फॅक्टरी योगदान देईल. मॉड्यूल ग्लास आणि फ्रेम तयार करण्यासाठी सहाय्यक युनिट्स स्थापित करून घरगुती पुरवठा साखळी वाढविण्याचा हा प्रकल्प असून त्यामुळे उच्च-गुणवत्तेच्या पीव्ही मॉड्यूलचे वेळेवर वितरण सुनिश्चित होणार आहे. याच श्रृंखलेत फडणवीस पुढे माहिती देताना म्हणाले की -

*सगळ्या गोष्टीं याच फॅक्टरीमध्ये बनणार असल्यामुळे आणि जे शोधक प्रकार इथे बनत आहे ते इफिशियंट पॅनल आहे. जागा देखील कमी लागते त्याची एफिशियन्सी*

*देखील जास्त आहे त्यामुळे अतिशय महत्त्वाच्या  अशा प्रकारचे इन्वेस्टमेंट आज या ठिकाणी नागपूर मध्ये आलं आहे.*

"ही सुविधा महाराष्ट्राच्या औद्योगिक वाढीबद्दल आवाडाची वचनबद्धता दाखवते आणि हे सौर उत्पादनासाठी मुख्य हब म्हणून महाराष्ट्राला बळकटी देते. या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि वातावरणावर त्याचा काय परिणाम होईल ते पाहण्यास आम्ही उत्सुक आहोत," अशा शब्दांत फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

---------------------------------------------------

स्वास्थ्य सुरक्षा संकल्प

देशात  २०२५-२०२६ पर्यंत २५  लाख अन्न हाताळणी सुरक्षेसंदर्भात प्रशिक्षित स्ट्रीट फूड विक्रेते तयार करणे हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट असून या अंतर्गत भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्रातर्फे 'स्वास्थ्य सुरक्षा संकल्प' हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविला  जाणार आहे.हे प्रशिक्षण हे उद्या सकाळी 10 वाजतापासून कविवर्य सुरेश भट सभागृह इथं होणार असून केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार आहे.

---------------------------------------------------

मनोरुग्णाचा हल्ला

आज सकाळी नागपूर रेल्वे स्थानकावर जयराम केवट या मनोरुग्णाने लाकडी पाटीनं केलेल्या हल्ल्यात दोन प्रवासी ठार झाले. तर दोन गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे नागपुर रेल्वे स्थानकावर खळबळ उडाली. नागपूर रेल्वे स्टेशनवरील फलाट क्रमांक सातवर प्रवासी रेल्वेची वाट पाहत होते. तेव्हा अचानक या मनोरुग्णानं लाकडी पाटीनं प्रवाशांवर हल्ला केला.५४  वर्षीय गणेश कुमार डी असं एका मृत प्रवाश्याच नाव असून तो तमिळनाडूतील दिंडीगुलचा रहिवासी होता. तर दुसऱ्या मृत प्रवाशाची अद्याप ओळख पटलेली नाही. आरोपीनं निर्घृणपणे हत्या केल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढत असता कर्मचाऱ्यांनी रेल्वे रुळावरून पाठलाग करून आरोपीला पकडलं आहे.

---------------------------------------------------

हिंदी विश्वविद्यालय

छापील शब्दांचं  महत्त्व कधीही कमी होणार नाही, असं प्रतिपादन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे कुलगुरू प्राध्यापक कृष्णकुमार सिंह यांनी केलं. आपल्या परंपरेत असं म्हटलं जातं की ज्ञानाशिवाय काहीही पवित्र नाही. ग्रंथालय कर्मचाऱ्यांची क्षमता विकसित करणे आणि लोकांना ग्रंथालयांकडे नेणे ही काळाची गरज आहे, असं  देखील सिंग म्हणाले.

*राष्ट्रीय पुस्तकालय मिशन के तहत भारत सरकार ने जो यह अभियान छेडा है, मैं समझता हूं कि इस अभियान के तहत देश भर के सार्वजनिक पुस्तकालय में जो कर्मचारी कार्यरत है उनकी क्षमता में निश्चित रूप से वृद्धि होगी और समाज को अधिक से अधिक पुस्तकों के प्रति जागरूक बनाने की दिशा में वे सक्रिय होंगे.*

**भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालया अंतर्गत कार्यरत असलेल्या राजाराम मोहन राय लायब्ररी फाउंडेशन, कोलकाता आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा यांच्या वतीनं सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय ग्रंथालय अभियानाच्या 47 व्या क्षमता निर्माण कार्यक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सिंह संबोधित करत होते. दिनांक 7 ते 11 ऑक्टोबर या कालावधीत गालिब सभागृहात आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटन आज सकाळी करण्यात आलं. या प्रशिक्षण कार्यक्रमात महाराष्ट्र, छत्तीसगड, तेलंगणा, गोवा या राज्यातून जवळपास 50 सार्वजनिक ग्रंथालयांचे कर्मचारी सहभागी झाले आहेत.**

**----------------------------------------------------**

**धर्मपाल मेश्राम**

**ॲट्रॉसिटी कायद्याचे उल्लंघन होऊन घडणाऱ्या घटनांमध्ये मृत पावलेल्या पीडिताच्या कुटुंबातील सदस्याला शासकीय नोकरी देण्यासंदर्भात राज्यात अन्य ठिकाणी देण्यात आलेल्या नोकऱ्यांचा आधार घेवून नागपूर जिल्हयातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढा, असे निर्देश अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी संबंधित यंत्रणाना आज नागपुरात दिले. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली रविभवन इथं जिल्हयातील अनुसूचित जाती-जमातीतील लोकांना देण्यात येणाऱ्या लाभाबद्दल तसेच ॲट्रॉसिटी गुन्हयांसंदर्भात आढावा घेण्यात आला.**

**----------------------------------------------------**

**अपघात**

**नवरात्रीनिमित्त माहूरगड येथील देवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या ईरटीका गाडीच्या चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे वाशिम जिल्हयातल्या पुसद-वाशिम मार्गावर कार दरीत कोसळून दोघांचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. जखमींना वाशिम इथं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सर्व प्रवासी अहिल्यानगर जिल्हयातले रहिवासी असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.**

**----------------------------------------------------**